# वृत्तपत्र आणि कायदा

भारतीय राज्यघटनेच्या कलम 19(1)मध्ये भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य देणेत आलेले आहे. मात्र हे स्वातंत्र्य अनिर्बंध नाही. कलम 19(2) मध्ये या स्वातंत्र्यावर खालील मर्यादा नमूद केलेल्या आहेत :-

भारताचे सार्वभौमत्व आणि एकत्मता, राष्ट्राची सुरक्षितता, परकीय राष्ट्रांवरोवरचे मैत्रीपूर्ण संवंध, समाजातील सुव्यवस्था, सदाभिरूची, नैतिकता किंवा न्यायालयाचा अवमान, वदनामी किंवा गुन्हा करण्यासाठी प्रोत्साहन देणे या संदर्भात वाजवी मर्यादा घालणारा कायदा संमत करता येतो.

**सकाळ पेपर्स विरूध्द यनियन ऑफ इंडीया (AIR 1962, Supreme Court 305)** कायद्याने वृत्तपत्रांच्या किंमतीनुसार पृष्ठ संख्येवर वंधन घातले होते. त्याचप्रमाणे एखाद्या वृत्तपत्राने किती पुरवण्या प्रसिध्द कराव्यात यावर वंधन घातले होते. तसेच वृत्तपत्रात दिल्या जाणा-या जाहीरातींचा आकार व जाहीरातीसाठी उपलव्ध असणारी एकूण जागा यावरही इतर मजकूराच्या प्रमाणात वंधन घालण्यात आले होते. त्यामागील हेतू माध्यमसंस्थेच्या क्षेत्रात निर्माण झालेली मक्तेदारी रोखने हा होता. परंतू न्यायालयाने या कायद्याचा भाषण स्वातंज्यावर प्रत्यक्ष परीणाम होतो म्हणून हा कायदा अवैध ठरविला.

न्यायालयीन अवमानाची आकरणात्मक (Mandatory) हुकूमाच्या वावतची कारवाई करण्यापूर्वी पुढील गोष्टी सिध्द व्हाव्या लागतात :

1. न्यायालयीन हुकूम त्या व्यक्तीवर कायदेशीररीत्या वजाविण्यात आला होता.
2. न्यायालयाचा अवमान करणारे नेमके कृत्य कोणते, ते स्पष्ट व्हावे लागते.
3. वर उल्लेखिलेले कृत्य जाणीवपूर्वक, हेतुत: करण्यात आले असले पाहिजे.
4. अवज्ञा करणारे कृत्य जाणीवपूर्वक, हेतुत: करण्यात आले असले पाहिजे.

**कायद्याच्या कलम 2 (क) मध्ये फौजदारी अवमानाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे :**

(1) न्यायालयांची निंदानालस्ती करणारी किंवा निंदानालस्ती करण्याकडे कल असणारी, किंवा न्यायालयाच्या अधिकारास कमीपणा आणणारी किंवा असा कमीपणा आणण्याकडे कल असणारी, किंवा

(2) कोठल्याही न्यायालयीन प्रक्रियेमध्ये पूर्वग्रह निर्माण करणारी, किंवा न्यायालयीन प्रक्रियेमध्ये ढवळाढवळ करणारी किंवा ढवळाढवळ करण्याकडे कल असणारी, किंवा

(3) न्यायाच्या कामकाजामध्ये हस्तक्षेप करणारी किंवा हस्तक्षेप करण्याकडे कल असणारी, किंवा न्यायाच्या कामकाजामध्ये अडथळा आणणारी किंवा अडथळा आणण्याकडे कल असणारी कोठलीही कृती करणे किंवा तोंडी अथवा लेखी या खाणाखुणा करून किंवा हावभावांवरून किंवा इतर कोठल्याही प्रकारे एखादी गोष्ट प्रसिध्द करणे हा 'न्यायालयाचा फौजदारी अवमान' या संज्ञेचा अर्थ आहे.

## वृत्तपत्रे आणि बदनामी

बदनामी झाल्याचे सिध्द करण्यासाठी पुढील महत्वाच्या गोष्टी न्यायालयासमोर सिध्द कराव्या लागतात

:-

1) प्रतिवादीने प्रसिध्द केलेला मजकूर किंवा (बदनामी तोंडी असल्यास) त्याचे वर्तन वादीच्या संदर्भात बदनामीकारक आहे.

2) वादी आणि प्रतिवादी यांच्याशिवाय तिस-या व्यक्तीस बदनामीकारक मजकूर माहीत झाला आहे.

3) बदनामीकारक मजकूर वादीस उद्देशून लिहीला आहे.

4) बदनामीकारक मजकूर हा खोटा आहे.

**बदनामी म्हणजे काय ?**

ज्या वेळेस मानसाच्या लौकीकास किंवा प्रतिष्ठेस धक्का पोहोचतो त्यावेळेस वदनामी झाली असे म्हंटले जाते. मानसाचा लौकीक किंवा प्रतिष्ठा म्हणजे त्याचे स्वत:वद्दलचे मत नव्हे तर समाजातील इतर मानसांच्या दृष्टीने त्याची प्रतिष्ठा किंवा इतरांचे त्याच्या बद्दलचे मत होय. उदा. विवाहीत किंवा विधवा स्त्रीवर व्यभिचाराचा आरोप करणे.

एका सुप्रसिध्द लेखकाच्या कायद्यावरील प्रसिध्द पुस्तकाची नवी आवृत्ती काढण्यात आली होती. तीत अनेक त्रुटी व चुका होत्या. मुळ लेखकाने ही आवृत्ती काढलेली नाही हे कोठेही नमूक केलेले नव्हते. सहाजीकच इतरांच्या दृष्टीने या पुस्तकाचा दर्जा खुपच खालावलेला होता. त्यामुळे लेखकाने प्रकाशकाविरूध्द केलेल्या वदनामीच्य खटल्याचा निकाल लेखकाच्या बाजूने लागला. सारासार विचार करणा-या व्यक्तीचे मत काय असू शकेल याचा विचार करावा लागतो. (Reasonable Man Test)

बदनामीच्या खटल्यात किंवा दाव्यात असलेले बचाव :

1. दाव्यात वादाचा विषय असलेले वर्तन किंवा बदनामीकारक मजकूर हा जाहीर झाला नव्हता.
2. वदनामीकारक मजकूर वादीस लागू पडत नाही.
3. मजकूर वदनामीकारक नाही.
4. लिहीलेला मजकूर सत्य नाही.
5. लिहीलेला मजकूर 'निरंकुश विशेषाधिकारांत' लिहीलेला आहे. (absolute privileges)
6. मर्यादित विशेषाधिकारांत चांगल्या वुध्दीने (वादीवद्दल दुष्ट वुध्दी न ठेवता) मजकूर लिहीला आहे. (qualified privilege)
7. लिहीलेला मजकूर म्हणजे लोकहिताच्या एखाद्या वावीवर योग्य व शुध्द हेतूने केलेली टीका होती. (Fair comment)
8. वादीच्या संमतीने मजकूर जाहीर करण्यात आला होता.
9. वादीने प्रतिवादीस वदनामीच्या जवावदारीतून मुक्त केले असल्याचे लिहून दिले असणे.
10. वदनामी झालेली व्यक्ती मरण पावली आहे.

11. दाव्यास मुदतीच्या कायद्याने बाध आला आहे.

**फौजदारी बदनामीची व्याख्या (कलम 499 इंडीयन पिनल कोड):**

एखाद्या व्यक्तीच्या अबुचे नुकसान करण्याच्या हेतूने किंवा आपल्या वर्तनाने नुकसान होण्यासारखे आहे हे माहीत असून किंवा असे मानण्यास आधार असतानाही पुढे दिलेल्या अपवादांव्यतिरिक्त, बोललेल्या शब्दांनी किंवा कोणी वाचावे, या उद्देशाने लिहीलेल्या शब्दांनी किंवा खुणांनी किंवा 'काही प्रतीके वापरून' कोणी त्या व्यक्तीवर काही आरोप केल्यास किंवा तो जाहीर केल्यास, त्याने त्या व्यक्तीची बदनामी केली, असे समजले जाते.

**वृत्तपत्रे आणि वृत्तपत्र मंडळ - वृत्तपत्र मंडळ कायदा (Press Council Act, 1978):** An Act to establish a Press Council for the purpose of preserving freedom of the press and of maintaining and improving the standard of newspapers and news agencies in India.

**वृत्तपत्र मंडळाची रचना (निवृत्त सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश)**

मंडळाचे कामकाज -

1. वृत्तपत्रे व वृत्तसंस्था यांना स्वत:चे स्वातंत्र्य टिकविण्यास मदत होते.
2. उच्च दर्जाच्या व्यावसायीक मुल्यांना अनुसरून वृत्तपत्रे, माध्यम-संस्था, पत्रकार यांच्यासाठी वागणुकीचे नियम बनविणे.
3. उच्च प्रतीची अभिरूची राखण्याची वृत्तपत्रांकडून, माध्यम-संस्थांकडून व पत्रकारांकडून हमी देणे, आणि नागरिकत्वाचे अधिकार व जबाबदा-या यांची त्यांना योग्य जाणीव करून देणे.
4. पत्रकारितेच्या व्यवसायात असणा-या सर्वांमध्ये जबाबदारीची जाणीव वाढीला लावणे.
5. सामाजिक हिताच्या व महत्वाच्या माहितीच्या प्रसारणावर बंधन घालणा-या घडामोडींकडे लक्ष ठेवणे.

6. परदेशी वृत्तपत्रांचा अभ्यास करणे इ. इ.

**वृत्तपत्र मंडळाचे कार्य काय आहे, हे याचा परिचय करून घेतल्यावर आपण त्याचे अधिकार कोणते ते पाहू.**

कलम 14 ने वृत्तपत्रे किंवा माध्यम-संस्था यांना समज देण्याचे अधिकार मंडळास दिले आहेत. एखाद्या वृत्तपत्राने, वृत्तसंस्थेने पत्रकारितेच्या नीतीमूल्यांचा किंवा सामाजिक अभिरूचीचा भंग केला आहे, अथवा एखाद्या पत्रकाराने वा संपादकाने व्यावसायिक दुर्वर्तन केले आहे, अशी मंडळाकडे तक्रार आली, किंवा मंडळाचे स्वत:चे तसे मत झाले, तर त्या वर्तमानपत्रास, माध्यम-संस्थेस वा पत्रकारास वा संपादकास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर या कायद्याच्या नियमांप्रमाणे चौकशी करून आवश्यक वाटल्यास त्यांना समज देणे, ताकीद देणे, त्यांच्या वर्तनाबद्दल आक्षेप घेणे किंवा त्यांच्या वर्तनाबद्दल नापसंती व्यक्त करणे या गोष्टी मंडळ करू शकते. मात्र मंडळाकडे आलेल्या प्रत्येक तक्रारीची दखल मंडळाने घेतलीच पाहिजे, असे नाही. तक्रारीत तथ्य नाही, असे अध्यक्षांना वाटल्यास, मंडळ तक्रारीची दखल घेत नाही.

**कलम 14(2)मध्ये मंडळास पुढील अधिकार दिले आहेत :**

वर्तमानपत्र वा माध्यमसंस्था वा संपादक वा पत्रकार यांच्याविरूध्द चौकशी केल्यानंतर त्या चौकशीसी संबंधीत काही भाग समाजहिताच्या दृष्टीने प्रसिध्द होणे आवश्यक आहे असे वाटल्यास मंडळ कोठल्याही वृत्तपत्रास त्या चौकशीचा योग्य तो भाग वर्तमानपत्राचे, माध्यम-संस्थेचे, संपादक व पत्रकाराचे नावासहीत प्रसिध्द करण्यास सांगू शकते. कलम 14(3) प्रमाणे न्यायालयात दाखल झालेल्या गोष्टीबाबत मात्र मंडळ चौकशी करू शकत नाही.

1950 साली रोमेश थापर विरूध्द स्टेट ऑफ मद्रास या कामामध्ये सर्वोच्च न्यायालयाने प्रथम भारतीय राज्यघटनेच्या कलम 19 मधील भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्य अंतभूत असलेचे नमूद केले आहे. या निकालामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे स्वातंत्र्य हे लोकशाहीचा एक मोठा आधारस्तंभ असल्याचेदेखील मान्य केलेले आहे. तसेच पुढे जाऊन सर्वोच्च न्यायालयाने 1973 मध्ये वी.सी. अँड कंपनी विरूध्द युनियन ऑफ इंडिया या निकालात प्रत्येक वृत्तपत्राला त्याची पृष्ठसंख्या, विक्रीची ठिकाणे व आवृत्या ठरविणेचादेखील अधिकार असल्याचे मान्य केलेले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने कांही दिवसापूर्वी दिलेल्या "मी नथुराम गोडसे बोलतो" या नाटकावर शासनाने घातलेली बंदी बेकायदेशीर असलेचा निर्णय व त्याचप्रमाणे 1967 साली ए.जे. करंदीकर विरूध्द महाराष्ट्र शासन, (AIR 1967 Bom. 11) या निकालामध्ये अशाचप्रकारच्या नथुराम गोडसे यांच्या पुष्ठ्यर्थ लिखान करणारा मार्गदीप या वृत्तपत्राचे संपादक या दोन्ही बाबतीत अशाप्रकारचे वक्तव्य हे भाष स्वातंत्र्याचे अधिकार असणारे वक्तव्य असल्याचे न्यायालयाने म्हंटलेले आहे. वृत्तपत्राचे मालक, चालक, मॅनेजर, प्रोप्रायटर हे बहुतेकवेळा वृत्तपत्रातील सर्व बातम्यांशी जबाबदार धरले जाऊ शकतात. मात्र त्यांनी असे स्पष्ट नमूद केले असले की त्यांच्या संमतीशिवाय कांही प्रकारचे बातम्या अगर लेख दिले गेले आहेत, तर मात्र त्यांना जबाबदारी टाळता येते. परंतु, यातदेखील त्यांच्या अप्रत्यक्ष संमतीने अशा बातम्या अगर लेख दिले जात असतील तर ते जबाबदार धरले जाऊ शकतात.